


## A note by Mr. Yogesh Bhange on Precision Sangeet Mahotsava 2017

TUESDAY, MARCH 7, 2017

सुप्रभात Ma’am,

दोन दिवस 'तुमच्या उष्ट्यासाठी  आलो' आणि भरून पावलो असा आम्हा 'स्पंदन' च्या  मंडळींना अनुभव आला.
जलतरंग आणि  बासरी मी तर पहिल्यांदाच प्रत्यक्ष ऐकली.  चारही कलाकारांचं सिलेक्शन अगदी योग्य होतं.
आमचेकडे मोडनिंबला अंतू नाना साठे यांच्या वाड्यात जलरंग वाजवायचे असे येथील जुनी मंडळी सांगतात.
आपल्यातले चे दोन कलाकार स्टेजवर पाहून ऊर अभिमानानं भरून आला.

शौनक यांना आमच्या 'स्पंदन' ग्रुपने दहा वर्षांपूर्वी मोडनिंब ला बोलावले होते. आत्ताची परिपक्वता वाखाणण्याजोगी होती.
बाकी 'Precision' नावाला साजेसं नेटकं नियोजन, स्टेज रचना, वेळांचं पालन, दोन दिवस राहणारी हुतात्माची आदर्श ठेवणं अशा कितीतरी कारणांनी  सोलापूर कर दरवर्षी  'प्रिसीजन महोत्सवा' ची वाट पहात असणं हि खूप जमेची बाब वाटते.
आमच्या शेजारी समुपदेशक ad. निला मोरे बसल्या होत्या  'प्रिसीजन'च्या मानसिकतेबद्दल बोलणे  झाले.

कुठलाही  अभिनिवेश न दाखवता साधेपणाने पण ऊच्च कोटीचा कार्यक्रम  सादर करण्याची खासियत चर्चिली.
आणि  एकूण 'प्रिसीजन' ने सोलापुरात रुजवलेल्या  आगळ्या  संस्कृती बद्दल ad. निला व आमच्या गावाकडच्या 'स्पंदन' परिवारा मध्ये गप्पा  झाल्या.

-योगेश भांगे